# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १३५ वा ❑ गुरूवार दि.१० जुलै २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)



# स्त्रीवादाचे विलोभनीय रूप मांडणाऱ्या - कवयित्री पद्मा गोळे

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

''नाही हो मी नुसती नार पेजेसाठी लाचार, शेजेसाठी आसूसणार, नाही मी नुसती मादी, मी माणूस माणूस आधी.. माणूस म्हणून जगणार.!''

मराठी साहित्यातील नवकवितेच्या प्रवाहातील एक महत्त्वाची कवयित्री, पद्माताई गोळे, ज्यांनी स्त्रीच्या अंतर्मनातील भावनांना ठामपणे आणि तितक्याच सौंदर्यपूर्ण भाषेत अभिव्यक्त केले आणि प्रसंगी आत्मभान जागृत ठेवताना स्वत्व शोधण्यासाठी बंडखोरी देखील केली. या कवितेत त्या पुरुषधार्जिण्या समाजावर प्रखर हल्ला चढवतात. त्या काळात स्त्रीच्या जाणिवेचा इतका परखड झंजावाती उच्चार करणारी त्यांची ही कविता त्याकाळाच्या दोन पावले पुढेच होती. ६० ते ८० च्या दशकात पद्माताईंनी आपल्या कवितांमधून मराठी रसिकांवर मोहिनी घातली. मळलेल्या पाऊलवाटेवरून न जाता चौकट तोडू पाहणारी कवयित्री म्हणजेच पद्माताई गोळे.






सरदार घराण्यात जन्माला येऊन घरातील धार्मिक वातावरण साहित्यप्रेम यांचं बाळकडू मिळाल्याने त्यांना कवितेचे वेड लागलं. सुरुवातीच्या हळुवार तरल अशा कवितांमधून बाहेर पडून त्यांच्या पुढील कवितांमध्ये एक वेगळीच नजाकत येत गेली. प्रेम या कल्पनेवरच उत्कट प्रेम करणाऱ्या अशा त्यांच्या कविता पुढे सरस होत गेल्या. प्रीती पथावर हा त्यांचा पहिला या काव्यसंग्रह. प्रेयस नि श्रेयस यांचा अनोखा मिलाफ पाहायला मिळतो. सौंदर्य, संघर्ष आणि सत्य यांचे एकत्रित दर्शन या कवितांमधून होतं. त्यांची प्रत्येक कविता गहिरा आशय पोहोचवणारी आणि उत्कट अनुभूती देणारी अशीच आहे. आपले अनुभव, जाणिवा यांमधून स्त्री जीवनावरील चिंतनात्मक लेखनातून त्यांनी स्त्रीवादाचे विलोभनीय रूप आपल्यासमोर उभे केले आहे. त्यांच्या प्रेम कवितांमधून विशुद्ध गाढभावना प्रत्ययास येते. प्रीती पथावर या पहिल्या काव्यसंग्रहानंतर निहार, स्वप्नजा, आकाशवेडी आणि श्रावणमेघ हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. १९४७ मध्ये प्रकाशित झालेला काव्यसंग्रह प्रीतीपथावर हा असून कविवर्य भा.रा. तांबे यांचा त्यावर प्रभाव होता. त्यानंतरच्या कविता अजूनही समृद्ध, परिपक्व होत गेल्या. तसेच रायगडावरील एक रात्र, स्वप्न या त्यांनी लिहिलेल्या नाट्यकृती देखील गाजल्या.

ज्या काळात पद्माताई कविता लिहित होत्या तो काळ स्त्रियांच्या आयुष्यातील एक क्रांती काळ ठरला होता. त्यांच्या सरळसोट आणि निमूट आयुष्याला एका वेगळ्याच धीट वळणाकडे घेऊन जाणार होता. मोकळेपणाचे वारे लाभले होते. विविध स्त्री साहित्यात आत्मभान जागृत करणारं लेखन येऊ लागलं होतं. त्याच सुमारास पद्माताई प्रेम कवितांमधून अत्यंत तरलतेनं स्त्रीचे भावविश्व उलगडण्याचे काम करीत होत्या. कळ्यांचे निःश्वास लिहिणाऱ्या विभावरी शिरूरकर यांचं त्यांना सखोल मार्गदर्शन लाभलं आणि मग त्यांच्या आत दडून बसलेली बंडखोर स्त्री उत्स्फूर्ततेने प्रकट झाली.

''नियतीने करायला लावले ते मी निमूट केले.

नियतीने करू नको म्हटले तेही धृष्टपणे केले.

नियतीच्या डाव्या पायाची ठोकर खात,

मी उजव्या पायाने तिला ठोकरुन दिले.

आता आमोरासमोर उभ्या आहोत दोघी,

आधी कोणाचा हात येतो पुढे

हस्तांदोलनासाठी ते आजमावित!''

नियतीच्या नजरेला नजर भिडवून निडरपणे भाष्य करणारी, तिला आव्हान देणारी ही कवयित्री.

''आम्ही कुलीनांच्या कन्या चाफेकळ्या पानां आड,

मुळी मांडू न आरास, मुग्धपणे लावू वेड !''

राजघराण्यात जन्मलेल्या या कवयित्रीला घराण्याच्या प्रतिष्ठेचा अभिमान, जाणीव आहे. आम्ही कुलीनांच्या कन्या ही कविता थेट स्त्रीमुक्तीचा नारा देत नसली तरी तात्कालीन स्त्रियांच्या जीवनाची दुसरी दुखरी बाजू दाखवून देते. त्यांच्या संवेदनशील लेखणीने नियमांच्या चौकटीत जगावे लागणाऱ्या स्त्रियांच्या वेदना आणि भावनांना वाचा फोडली आहे.




ज्येष्ठ कवयित्री इंदिरा संत म्हणतात,पद्मा गोळे यांचे लेखन म्हणजे सुरांचा शिस्तबद्ध कोलाज आहे. ना.ग. गोरे, अच्युतराव पटवर्धन, एस.एम. जोशी यांच्या समाजवादी विचारांचा प्रभाव पद्माताईंवर होता त्यामुळेच घराच्या सुरक्षित सुखासीन आणि आश्वासक चौकटी बाहेरचे जग त्यांना दिसलं. समाजातील गृहीत धरलेल्या व्यवस्थेवर परखडपणे भाष्य करणारी अभिव्यक्ती त्यांच्यात निर्माण झाली. मनातलं संचित या दुर्मिळ लेखात त्या म्हणतात,''लेखन हे माझ्यासाठी नेहमीच एक निवांत सखी राहिलं आहे .मी घराच्या गच्चीवर बसून लिहिलेल्या ओळी मला माझ्या अस्तित्वाशी अधिक जोडतात. स्त्री म्हणून मला वेगळं काही सांगायचं नव्हतं पण जे जगावे लागलं ते लिहिलं.पद्माताईंच्या लिखाणाचा केंद्रबिंदू स्त्रीचा आत्मभान हाच होता. तिच्या भूमिकांमधून स्वतःला शोधण्याची गरज, निसर्ग आणि स्त्री ,बदलत्या ऋतूंमध्ये तिच्या भावभावनांची तुलना, कुटुंबातील तिची उपस्थिती, तिचं अंधुक होत गेलेलं पण महत्त्वाचं अस्तित्व, सौंदर्याच्या संकल्पना, त्यातली बंधनं आणि स्वातंत्र्य असे स्व-स्पर्शी आणि तितकेच सर्वस्पर्शी असे विचारांचे विविध पैलू त्यांच्या कवितांच्या मुळाशी आहेत. मी एक पक्षिण आकाश वेडी या कवितेंत ढग, चांदण्या, गंधित माती अशी निसर्गाची विलोभनीय रूपं आहेत. निसर्गातील ही प्रतीकं, प्रतिमा वापरून स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडणारा स्त्रीचा तो एक आत्मकथन पर प्रवास आहे. ती उडते, गाते, स्वतः दंग होते तेही स्वतः च्याच आकाशात.

(क्रमशः)

## विशेष लेख...

# प्लास्टिकच्या फुलांचे शेतकऱ्यांसमोर आव्हान !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्यं

प्लास्टिकच्या फुलांमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. बाजारात प्लास्टिकच्या फुलांची मोठ्या प्रमाणात आवक होत असल्याने, नैसर्गिक फुलांना मागणी घटली आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या समस्येवर मात करण्यासाठी, शेतकऱ्यांनी एकत्र येऊन प्लास्टिक फुलांच्या दुष्परिणामांबद्दल जनजागृती करणे आणि नैसर्गिक फुलांचे महत्व लोकांना समजावून सांगणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर राज्यसरकार देखील जागृत झाली असून

राज्यातील फुल उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी प्लास्टीक-कृत्रिम फुलावर बंदी घालण्यासंदर्भात पर्यावरण मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन अधिवेशन संपण्यापूर्वी धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी विधानसभेत सांगितले.

राज्यात अलिकडच्या काळात प्रत्येक समारंभ, मंगल कार्यालय,मंदीरे, उत्सवात प्लास्टीकच्या फुलांचा मोठ्याप्रमाणावर वापर होत आहे. त्यामुळे फूल शेती करणारा २० -२५ टक्के शेतकरी अडचणीत आला असून फूलशेती संकटात आल्यास मध उत्पादनावरही विपरित परिणाम होईल असे सांगत प्लास्टीक फुलावर तातडीने बंदी घालण्याची मागणी सर्वपक्षीय सदस्यांनी केली.

विशेष म्हणजे प्लास्टिकची फुले दिसायला आकर्षक आणि टिकाऊ असल्याने, नैसर्गिक फुलांपेक्षा त्यांची मागणी जास्त आहे. यामुळे, नैसर्गिक फुलांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

नैसर्गिक फुलांची मागणी कमी झाल्यामुळे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होतो. त्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही, ज्यामुळे आर्थिक अडचणी येतात. शिवाय प्लास्टिक फुलांच्या वापरामुळे पर्यावरणावरही नकारात्मक परिणाम होतो. प्लास्टिक कचरा वाढतो, तसेच ते विघटनशील नसल्यामुळे माती आणि पाण्याच्या प्रदूषणालाही कारणीभूत ठरते.

प्लास्टिक फुलांत रंग वापरले जातात. वापरात कॅन्सरसारखे आजार रक्त आणि फुप्फुसांचे कॅन्सर होतो. फुलशेतीच्या माध्यमातून मधमाशापालन करुन परागाभवनाची नैसर्गिक प्रक्रिया होते मात्र फुलशेती नष्ट होत असल्याने कृत्रिमरित्या परागीभवन करून पुन्हा कॅन्सरसारख्या आजारांना निमंत्रण दिलं जायतं. नॅशनल हॉर्टिकल्चरच्या माध्यमातून फुलशेतीला प्रोत्साहन दिलं जातंय.मात्र सरकारचंचं धोरण फुलशेती शेतक-यांना मारक ठरतंय.

प्लास्टिक फुलांच्या वापरामुळे होणारे दुष्परिणाम आणि पर्यावरणावर होणारा परिणाम याबद्दल शेतकऱ्यांनी आणि नागरिकांनी जागरूक असणे आवश्यक आहे. नैसर्गिक फुलांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. नैसर्गिक फुलांचे महत्व लोकांपर्यंत पोहोचवणे, तसेच त्यांच्या वापराला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्लास्टिकऐवजी नैसर्गिक, (नैसर्गिकरित्या विघटनशील) वस्तूंचा वापर करणे, हा एक चांगला पर्याय असू शकतो.

**सरकारी योजनांचा लाभ :**

शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन, शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, नैसर्गिक फुलांचे उत्पादन वाढवू शकतात. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन, सहकारी तत्वावर काम केल्यास, या समस्येचा प्रभावीपणे सामना करता येईल.फुलांच्या उत्पादनाचे नियोजन आणि व्यवस्थापन योग्य प्रकारे केल्यास, मालाची नासाडी टाळता येते आणि चांगला भाव मिळवता येतो.






# अर्जेंटीना - दक्षिण अमेरिकेतील भारताचा विश्वासू भागीदार

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या पाच देशांच्या ब्राझील दौऱ्यातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून अर्जेंटिना भेटीचे वर्णन करावे लागेल. भू राजनैतिकदृष्टीने अर्जेंटिना या देशाचे दक्षिण अमेरिका खंडामध्ये एक स्वतंत्र महत्त्वाचे स्थान आहे ब्राझील नंतर दक्षिण अमेरिकेतील दुसरा सर्वात मोठा देश म्हणून अर्जेंटिना ओळखला जातो. त्याच्या पश्चिमेस चिली हा देश असून दक्षिणेस बोलीव्हिया आणि पॅराग्वे हे देश वसलेले आहेत तर उत्तरेस ब्राझील आणि पूर्वेस उरगवे या देशांच्या सीमा आहेत. दक्षिणेस अथांग अटलांटिक महासागर पसरलेला आहे अर्जेंटिना हे एक प्रजासत्ताक संघराज्य राष्ट्र आहे. त्यामध्ये एकूण २३ प्रांतांचा समावेश होतो ब्युनोस आयर्स ही त्याची राजधानी असून ते या देशातील सर्वात मोठे शहर आहे. एकता आणि स्वातंत्र्य हे त्याचे घोषवाक्य असून या राष्ट्राची लोकशाही मूल्यावर ढळ श्रद्धा आहे. १८१६ साली स्पेन पासून या देशाने स्वातंत्र्य मिळविले आणि त्याने आपले स्वतःचे संविधान १८५३ मध्ये स्वीकारले. या देशाचा जीडीपी आणि मानव विकास निर्देशांक निश्चितच उत्तम प्रकारे पुढे सरकत आहे. भारत आणि अर्जेनताना यांच्यातील राजकीय संबंधचे ७५ वर्ष साजरे होत आहेत. त्यामुळे ही भेट महत्वाची आहे.

**स्वातंत्र्याचा प्रेरक इतिहास**

अर्जेंटिना या शब्दाचा अर्थ चांदीचा प्रदेश असा होतो हा प्रदेश चांदी सारख्या खनिजांनी आरंभापासून संपन्न आहे त्यामुळे त्याच्या नावातच चांदीचा चमकदारपणा दिसून येतो या शब्दाची उत्पत्ती लॅटिन आणि स्पॅनिश मूळ धातू पर्यंत जाते अर्जंटा या शब्दाचा अर्थ लॅटिनमध्ये चांदीने बनलेला किंवा चमकदार असा होतो.

मार्टिन डेल बारको या लेखकाने १६०२ मध्ये एक सुंदर काव्य रचले. या काव्यामध्ये त्याने प्रथमतः अर्जेंटिना असा शब्द वापरला होता स्पॅनिश प्रभाव काळात या शब्दामागे द अर्जेंटिना असे लिहिण्याचा प्रघात होता पण पुढे स्वातंत्र्य युद्धानंतर ही परंपरा मोडीत निघाली व देशाचे नाव स्पष्टपणे अर्जेंटिना असे उच्चारले जाऊ लागले. येथील शूर स्वातंत्र्यवीरांनी स्पॅनिश साम्राज्याशी झुंज देऊन स्वातंत्र्य मिळविले. या देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास मोठा रोमहर्षक आहे भारतीयांनी इंग्रजांशी जसा लढा दिला तसा येथील लोकांनी स्पेनशी लढून स्वातंत्र्य मिळविले आहे दोन्ही देश वसाहतवादाविरुद्ध झुंज दिल्यामुळे समान लोकशाही मूल्यावर नितांत श्रद्धा ठेवून वाटचाल करत आहेत.

प्राचीन अर्जेंटिना चा इतिहास नवाश्मयुगापासून सुरू होतो तसेच या देशाच्या इतिहासामध्ये कोलंबिया पर्व तसेच गृहयुद्ध आणि स्वातंत्र्याची लढाई असे काही महत्त्वाचे ठळकबिंदू आहेत १८७१ ते ७४ या काळात देशांमध्ये जबरदस्त अंतर्गत संघर्ष आणि वादळे घडून आली. पुढे तेथील राष्ट्राध्यक्ष रोकोस्पेना यांच्या काळात जनतेला मतदानाचा अधिकार देण्यात आला आणि देश हळूहळू लोकशाही प्रजासत्ताकाकडे वाटचाल करू लागला.

१९४६ मध्ये जॉन पेरणे या लेबर नेत्याने राष्ट्रीयकरण करून तेथील आर्थिक जीवनात समानता आणि सामाजिक न्याय यांची प्रस्थापना केली.

१९४७ मध्ये महिलांना मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला तसेच शोषणाविरुद्ध कायदे संमत करून गरिबांच्या हक्कांचे रक्षण करण्यात आले. १९८३ नंतर अर्जेंटिनामध्ये लोकशाहीचे पुनरागमन झाले आणि आता हा देश प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उत्तम प्रकारे वाटचाल करत आहे. अर्जेंटिना मध्ये प्रमुख जलस्त्रोत म्हणून संपन्न अशी १२ प्रमुख नद्यांची परंपरा आहे शिवाय एकूण



प्रदेशापैकी दहा टक्के भाग हा संपन्न वनांनी युक्त असून जैवविविधतेने नटलेला जगातील एक वैशिष्ट्यपूर्ण देश म्हणून त्याचे महत्त्व आहे. कृषीप्रधान अर्जेंटिना




गहू, कापूस, सोयाबीन तसेच फलोत्पादन, पशुधन या क्षेत्रात आघाडीवर तर आहेच शिवाय खनिज धातूमध्ये लिथियम, चांदी, सोने ही खनिज संपत्ती सुद्धा या देशाचे एक वैभव आहे

**द्विपक्षीय संबंधातील नवे पर्व**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अर्जेटिना भेटीमुळे द्विपक्षीय संबंधात एक नवे उत्साहाचे पर्व सुरू झाले आहे. मोदी भाई हे ५७ वर्षांनी अर्जेन्टीनाला भेट देणारे पाहिले पंतप्रधान आहेत. राष्ट्राध्यक्ष जावीअर मिली यांच्याबरोबर पंतप्रधानांनी प्रमुख मुद्द्यावर चर्चा केली तसेच उच्चस्तरीय शिष्टमंडळाने सुद्धा परस्पर सहकार्याच्या क्षेत्राबद्दल विविध संधी आणि आव्हाने यांची पडताळणी केली. त्यामुळे दोन्ही राष्ट्रातील व्यापार वाढवून राजकीय संबंधास नवी गती लाभली आहे परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव पी कुमारन यांच्या मते दोन्ही नेत्यांनी व्यापार, वाणिज्य तसेच तंत्रज्ञान, संरक्षण, उत्पादन, अवकाश, संशोधन, आरोग्यसेवा, औषध निर्मिती यासारख्या प्रमुख क्षेत्रात परस्पर सहकार्याची अनेक मौलिक क्षितिजे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. मधे जगात दुसऱ्या क्रमांकाचा शेल गॅस साथ असून चौथ्या क्रमांकचा शेल ऑइल साठा आहे. त्यामुळे अर्जेन्टीना भारताचा एक ऊर्जा भागीदार म्हणून उदयास येत आहे. तसेच धोरणात्मक भागीदारीला सुद्धा दृढ रूप कसे देता येईल यावरही विचार करण्यात आला. परवडणाऱ्या उच्च दर्जाच्या औषधांच्या निर्मिती क्षेत्रात भारताचा महत्त्वाचा वाटा असून याबाबत भारत अर्जेंटिनाला मार्गदर्शन करू शकतो. युरोपियन आरोग्य संस्थाने मान्य केलेल्या भारतीय औषधांच्या उपलब्धतेमुळे अर्जेटिना मधील लोकांचा चांगला फायदा होऊ शकतो विपुल नैसर्गिक साधन संपत्तीमुळे अर्जेंटिना भारताचा एक प्रभावी ऊर्जा भागीदार होऊ शकतो अंतराळ संशोधन क्षेत्र हे सुद्धा उभय राष्ट्रातील सहकार्यासाठी एक नवे क्षितिज आहे २००७ साली भारताच्या इसरो या संस्थेने अर्जेंटिनाचा एक उपग्रह अंतराळात सोडला होता तेव्हापासून उभय देशात अंतराळ संशोधन क्षेत्रात सहकार्याला प्रारंभ झाला आहे. आता या क्षेत्रात काही नव्या उपलब्धीवर दोन्ही देशांचे लक्ष आहे शिष्टमंडळ स्तरावर दोन्ही देशांमध्ये झालेली चर्चा अत्यंत फलदायी ठरली आहे भारत आणि अर्जेंटिना आता संरक्षण उत्पादन क्षेत्रात काही नवे प्रकल्प हाती घेऊ शकतात. २०१९ मध्ये तेव्हाचे अध्यक्ष मॉरिशिया मॅकरी यांनी रणनीतिक भागीदारीचा हात पुढे केला आणि आता या क्षेत्रात आणखी पुढे दमदार पाऊल टाकण्यासाठी दोन्ही देश सज्ज झाले आहेत दहशतवाद हा दोन्ही देशांना समान शत्रू आहे आणि लोकशाहीचे रक्षण हा दोन्ही देशांमधील समान भक्कम सुवर्ण धागा आहे.

**समारोप**

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अर्जेंटिना दौरामुळे उभय राष्ट्रातील संबंधात नवे महापर्व उदयास आले आहे त्यांना तेथे पाऊल ठेवताच तेथील अध्यक्षांनी विनोद आयरिस या शहराची चावी देण्याचा कार्यक्रम हाती घेतला, तसेच जनरल जोसे डी सॅन मार्टिन जे कि अर्जेन्टीनाच्या दृढ संकल्प।चे प्रतीक मानले जातात, यांच्या स्मारकस पुष्प चक्र वाहिले आणि दौरा संपन्यापूर्वी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि महाकवी रवींद्रनाथ टागोर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. उभय देशांमध्ये संवाद पूर्ण मैत्री आणि आर्थिक सांस्कृतिक संबंधाचे नवे महापर्व उदयास आले आहे. दक्षिण अमेरिकेतील भारताचा एक विश्वासू आणि सक्रिय भागीदार म्हणून आता अर्जेंटिनाकडे पाहिले जात आहे जगातील तिसरी अर्थव्यवस्था म्हणून भारताचा उदय होत असताना अशा प्रकारच्या प्रभावी मित्र आणि दोस्त राष्ट्रांचे योगदान खरोखरच सक्रिय शाश्वत विकासासाठी वरदान ठरणार आहे यात शंका नाही.




# जात्यावरच्या ओव्या......

इहीन इव्हायाची
नाही जगामध्ये वाण
घातलीया झड
बंधू करणीचे म्हण ||१५९||

जाऊ तूहा भाऊ
भेटला शेर_ ताटी
धरते मनगटी
चाल तुह्या बहिणीसाठी||१६०||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# (सहन) शीलं परमं भूषणम्




**ज्योतिर्मय साहित्य**


आजच्या धावपळीच्या, प्रतिक्रिया-प्रधान काळात ‘‘सहन करणं‘‘ ही गोष्ट दुर्बळपणाचं लक्षण मानली जाते. पण सहन करणारा दुबळा नसतो, तो अधिक सशक्त असतो. कारण त्याच्या मनात आत्मविश्वास असतो, आणि आचरणात संयम. पण आजच्या काळात सहनशीलता नावाचं हे तेजस्वी शीलच लुप्त होत चाललं आहे. तरुण पिढीजवळ सहनशीलता तर नावालाही उरलेली नाही. जरा काही मनाविरुद्ध घडले की लागलीच संताप, राग, द्वेष, चिड किंवा आत्महत्या ठरलेली.



मग ज्यांनी आपल्या आयुष्यात सहनशीलतेचं परमोच्च दर्शन घडवलं अशी उदाहरणं मला आठवायला लागली. या सहनशीलतेच्या जोरावरच ते आपल्या आयुष्यात मोठी कामगिरी करून दाखवू शकले. सहनशीलता म्हणजे दुर्बलता नव्हे. आलेल्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याचं ते एक जीवनमूल्य आहे असं मला वाटत. मला संत ज्ञानेश्वरांचं उदाहरण आठवलं. ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताई या भावंडांचं संपूर्ण जीवन म्हणजे सहनशीलतेचा अखंड प्रवास ! ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी विठ्ठलपंतांनी संन्यास स्वीकारल्यानंतर गुरुआज्ञेवरून गृहस्थाश्रम स्वीकारला. पण समाजाने या निरागस, निष्पाप भावंडाना त्यांचा काही एक दोष नसताना वाळीत टाकलं. त्यांचा अपरिमित छळ केला. पण तरीही समाजाप्रती त्यांच्या मनात प्रेम आणि करुणाच होती. ज्ञानेश्वरांनी तर अखिल विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले. ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांचं हे सहनशील असणं हे त्यांच्या ज्ञानाइतकंच तेजस्वी होतं.

मर्यादा पुरषोत्तम श्रीराम तर सहनशीलतेचा आदर्श ! ते केवळ वीरपुरुष नव्हते तर शीलाचं साक्षात मूर्तिमंत रूप होते. कैकेयीच्या वचनामुळे १४ वर्षांचा वनवास पत्करताना त्यांनी कोणताही रोष व्यक्त केला नाही. पित्याच्या वचनाचा सन्मान करत ते हसतमुखाने अरण्यात गेले. सीतेवर समाजाने शंका घेतल्यावर, राजधर्म जपण्यासाठी त्यांनी वैयक्तिक दुःख गिळून सीतेला वनवासात पाठवलं. हा त्याग त्यांच्या शीलतेचा परमोच्च बिंदू ठरतो.

विभीषण रावणाचा भाऊ असूनही जेव्हा शरण येतो, तेव्हा राम म्हणतात ‘‘शरणागताचा मी त्याग करणार नाही.‘‘ ही त्यांच्या सहनशीलतेतील करुणा आणि नीतिनिष्ठा दर्शवणारी गोष्ट आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचं जीवन हे तर शीलाचं आदर्श उदाहरण. त्याग, संयम आणि सहनशीलता यांचं दर्शन त्यांनी आपल्या जीवनात घडवलं. अहिल्याबाई होळकर यांचं जीवनही यापेक्षा वेगळं नाही. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# मुक्तिचतुष्ट्य

**ज्योतिर्मय साहित्य**

दशक चौथा, समास दहावा

नमस्कार भगवंत भक्त मंडळी.

सांगायला आनंद होत आहे आज आपण चौथ्या दशकातील दहावा समास पूर्ण करत आहोत. दासबोधाचा अभ्यास करत असताना एवढं एकरूप व्हायला लागले की चार दशका पर्यन्तचा प्रवास कसा झाला ते समजलं पण नाही. समर्थानी शेवट पर्यंत तारून न्यावे हे आग्रही मागणे मागते.

हरिपाठात आपण मुक्ति हा शब्द पाहिला आहे. समर्थानी मुक्तिचतुष्ट्य एक समास लिहिला आहे. पूर्ण पणे सर्व प्रकारच्या दु:खापासून ,बंधनापासून, वासनापासून, अज्ञानापासून, गैरव्यवहारा पासून, गैरकारभारापासून, वाईटविचारा पासून मोकळे होण्याच्या अवस्थेला मुक्ति म्हणतात.

‘‘अविद्यास्तमय़ो मोक्ष:‘‘ साच बंध उदाह्दत:‘‘

म्हणजे अविद्येच्या किंवा अज्ञानाच्या बंधनातून मोकळे होणे. सुटणे याचे नाव मोक्ष होय.

मुक्तिचं मुख्य लक्षण कोणतं तर भक्ताने भगवंत स्वरूप परमात्माशी एकरूप होणे होय.

मुक्तिची अवस्था म्हणजे पूर्णज्ञानावस्था. ज्ञान आहे पण अज्ञानाचा लवलेशही नाही. ज्ञान होते ते कधीही लोप पावत नाही. त्याला जन्ममरण नाही. त्याला ऊदयास्त नाही. ते नेहमीच विनम्र असते. अहंकार रहीत असते. ते अनंत आहे. देश, काल, वस्तु या साधनानी ते आवरले जात नाही. ते स्वयंप्रकाशी आहे. सिध्द आहे. ते स्वसंवेद्य आहे. आणि ते परमात्म स्वरूप आहे.

तर मित्रांनो असे ज्ञात तुमच्या आमच्या कडे असावे असे वाटते ना! मग आपण सगळे भगवंताशी एकरूप होऊया.

**(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# विषयाची व लौकिकाची आस सोडावी.

**ज्योतिर्मय साहित्य**

आपण रामाचे झालो म्हणजे आपली काळजी त्याला लागते. आपण रामाचे व्हायला अडचण आमचीच. आवडच मुळी आपण विषयाची आणि लौकिकाची ठेवतो. साहजिकच, एकाची आसक्ती ठेवल्याने दुसऱ्याची विरक्ती येते. नोकरीच्या वेळेस आम्ही बायकोमुलांना बाजूला सारून कामावर जातो ना? मग साधनेच्या वेळी बायकोमुले आड येतात हे कारण का सांगावे ? बायको आणि पैका या दोन गोष्टी आमच्या आड येत असतात; असे आजवर अनेक संतांनी सांगितले. मग या निर्माण तरी का केल्या असे कोणी विचारतील. त्याला उत्तर म्हणजे, काड्याच्या पेटीने विस्तवही पेटविता येतो आणि घरही जाळता येते; त्याचा जसा आपण उपयोग करावा तसा तो होतो. खरे म्हणजे आम्हाला भगवंताची तळमळच लागत नाही. एकजण मला म्हणाला की, ‘‘मला प्रपंच टाकावासा वाटतो. ’’मी त्याला म्हटले, ‘‘नुसता प्रपंच टाकण्याने तुला वैराग्य कसे येईल ? वैराग्याला नेहमी विवेकाची जोड लागते. तू आपला मीपणा टाकलास तरी खूप झाले.’’

चांगले कर्म आड येत नाही असे थोडेच आहे ? वाईट कर्म कुणाला सांगण्याची तरी आपल्याला लाज वाटते, पण सत्कर्म आपण अभिमानाने ज्याला त्याला सांगत सुटतो. ‘ मागील जन्मी पाप केले होते म्हणून या जन्मी हे भोगतो ’ असे म्हणतो; आणि ‘आता चांगली कर्मे करतो म्हणजे पुढल्या जन्मी सुख लागेल ’ असे म्हणतो. म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटण्याऐवजी त्याच्यात गुंडाळले जाण्यासारखेच झाले ! दुष्कर्मामुळे पश्चात्ताप होऊन एकदा तरी भगवंताची आठवण होईल; परंतु सत्कर्माचा अहंकार चांगल्या माणसालाही कुठे नेऊन सोडील याचा पत्ता लागणार नाही.

राजासुद्धा योग्य मार्ग दाखविण्यासाठी आपल्या संगतीला चांगला माणूस ठेवतो. भगवंताने उद्धवालाही ‘ सत्समागम कर ’ म्हणून सांगावे, याहून अधिक काय पाहिजे ? कडू कारले खाल्ले तर कडूपणाचीच प्रचीती येते, मग विषयाच्या प्राप्तीने जीवन गोड कसे होईल ? ‘ प्रेम येईल तेव्हा भगवंताची भक्ती करीन ’ असे म्हणू नये. विषयासाठी आपण मरमर काम करतो आणि तेवढे करूनही सुख लाभत नाही; मग भगवंताचे नाव न घेता, प्रेम येत नाही हे म्हणणे किती वेडेपणाचे आहे ! लग्नाआधी मुलीला दहापाचजणांना दाखविली तरी, लग्न झाल्यावर ज्याप्रमाणे त्यातला एकच नवरा असतो आणि बाकीच्यांची तिला आठवणही राहत नाही, त्याप्रमाणे, आम्ही एकदा रामाचे झालो, म्हणजे त्याच्याशी लग्न लावले, म्हणजे मग विषयांचे प्रेम कुठे आले?

भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे : एक प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी, आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी.

***

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# संत श्रेष्ठ श्री नामदेव महाराज यांचा अभंग

**ज्योतिर्मय साहित्य**

या स्थितीत बोध अवस्था असते व अखंड आनंदाची अनुभूती इथे येते. या नाड्यांच्या त्रिवेणी संगमात स्नान करणे म्हणजे किती आनंदमय आहे असे नामदेव महाराज येथे म्हणत आहेत. ही स्थिती गुरूच्या सहाय्या शिवाय येणे शक्य नसते म्हणून गुरुमुखी स्नान करी परब्रम्ही लक्ष धरी असे नामदेव महाराज म्हणीत आहेत.

ही समाधी स्थिती कायम टिकावी असा प्रयत्न साधन म्हणून महाराज करीत आहेत. सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ झाला की यानंतर निर्वीकल्प समाधीचा अभ्यास साधकाचा सुरू होतो. या अवस्थेत परमोच्च अनुभव म्हणजे, शून्याचा अनुभव. इथे साधकातील मी तु पणा संपलेला असतो. देह भावना शून्य झालेली असते.समाधी गाढ लागते. आणि एक अंधारी पोकळी त्यास जाणवते. व त्या अंधाऱ्या विहिरीत किंवा अंधाऱ्या शून्यात इतर काहीही जाणवत नाही. या अंधाऱ्या गुहेत साधक घाबरा होतो कारण त्याचे मन हे मरण्यासाठी सिद्ध होत नसते पण ते जवळपास मेल्यातच जमा असते. त्यामुळे अनुभवाची नोंद तर होते पण तो कोणास अनुभव येतो आहे ,हेही कळत नाही. शरीर दगडा प्रमाणे निश्चल झालेले असते. (म्हणूनच कदाचित भगवान महावीर व भगवान गौतम बुद्ध यांच्या मुर्त्या ह्या पाषाणाच्या दाखविलेल्या असाव्यात) त्या पाषाणा सारखे शरीर निश्चल झालेले असते. आणि अवतीभवती केवळ अंधकार. याचा शेवट व सुरुवात दोन्हीही सापडत नाही. अशा स्थितीत साधक घाबरा होतो. येथे त्यास गुरुकृपेने अनुहात नाद ऐकावयास येतो. अनुहात किंवा अनाहत नाद याचा अर्थ आघाताशिवाय निर्माण झालेला ध्वनी. कोणताही ध्वनी निर्माण होण्यासाठी आघात व्हावा लागतो. पण हा ध्वनी आघाताशिवाय झालेला असतो.

अनाहत नाद ऐकावयास मिळणे ही जणू काय आपल्या लांब पल्ल्याच्या ट्रेनमध्ये आपण बसलो आहोत आणि आपले गंतव्य स्थान आता नजदीक आले आहे. त्या स्थानाची खुण म्हणून अनाहत नादाकडे पाहिल्या जाते. या अनाहत नादाच्या सहाय्याने साधक ते महा शून्य पार करून पुन्हा देह भानावर येतो.उन्मनी आणि जागृती अवस्था याचा अनुभव त्यास वारंवार येत राहतो. उन्मनी अवस्था ही गोल्हाट मंडळ म्हणजेच सहस्त्रार चक्र(हे चक्र गोलाकार आहे म्हणून) वर प्राण स्थिरावणे यामुळे येत असते. येथे पोहोचल्यानंतरच आत्म्याचे दर्शन वेगळे होत असते म्हणून तेथून निराळ पाहे निजतत्व असे म्हटले आहे. *विष्णुदास नामा म्हणे अनुभवी तोच जाणे आम्ही गुरु खुणे वर्ततसो* सांगून नामदेव महाराज आपल्या दिव्य साधनेचा अनुभव त्यांना त्यांच्या गुरु प्रसादामुळे मिळाला असे सांगतात. या अभंगातून आपणास असे स्पष्ट होते की संतश्रेष्ठ श्री नामदेव रायांनी किती उच्च प्रतीची योग साधना पूर्ण केली आहे.

एरवी समाजात त्यांची प्रतिमा केवळ गळ्यात विणा घालून हाती चिपळ्या घेऊन प्रभू कीर्तनात नाचणारे नामदेव महाराज एवढीच आपणास माहिती आहे. पण त्यांची अंतरंगातील साधना किती दृढतेने त्यांनी पूर्ण केली, यांचा या भागातून आपणास बोध झाल्याशिवाय राहणार नाही.

मार्गदर्शन :- जेष्ठ साधक व माझे काका श्री मुरलीधर बोरीकर
निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरी माऊली !

**(क्रमशः)**

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**जगदम्ब नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं नमो नमः।**
**श्रीरेणुके नमस्तुभ्यं कल्पवल्लि नमो नमः।। ४० ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो. तुला नमस्कार असो. श्रीरेणुके, तुला नमस्कार असो. हे कल्पवल्ली, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं भयनाशिनि ते नमः।**
**अभयदे नमस्तुभ्यं सर्वदे ते नमो नमः।। ४१ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. भय नष्ट करणारे तुला नमस्कार असो. अभय देणारे तुला नमस्कार असो. सर्व काही देणारे, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं जानासि मे मनोरथम्।**
**त्वया विना न पूर्तिश्च तस्य भवितुमर्हति।। ४२ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तू माझे मनोरथ जाणतेस. तुझ्या विना त्याची पुरती होणे शक्य नाही.

**जगदम्ब नमस्तुभ्यं मनो ममास्तु निर्मलम्।**
**विशुद्धहृदि मे देवि वासोऽस्तु तव सर्वदा।। ४३ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. माझे मन निर्मलअसावे. हे देवी, माझ्या विशुद्ध हृदयात तुझा सर्वदा वास असावा.




# अक्रोड...

**ज्योतिर्मय साहित्य**

विविध प्रकारच्या ड्राय फ्रुटमधले हे एक दर्जेदार, पौष्टिक फळ आहे, अक्रोडात अनेक आरोग्यदायी गुणधर्म आढळत असून शरिराची रोगप्रतिकारशक्ती

वाढवण्यासाठी हे अतिशय फायदेशिर आहे.

अक्रोडला ‘‘ब्रेन फूड‘‘ असे म्हणतात. अक्रोडात खुप प्रकारचे विटामिन असतात, जसे कि, विटामिन , , , १२, विटामिन , म्हणूनच याला विटामिनचा राजा म्हणतात.

अक्रोड आपल्या मेंदूसाठी खुपच फायदेशिर आहे. हे जवळपास मानवी मेंदू सारखेच दिसते, याच्या सेवनाने मानसिक ताण दूर होतो, मन प्रसन्न होते, बौद्धिक पातळी वाढते( . .). स्मरणशक्ति वाढते, अक्रोडात शक्तिशाली न्यूरो प्रोटेक्टिव कंपाउंड सारखे विटमिन . -३ व एंटि ऑक्सिडंट असतात. ज्यामूळे मेंदूला सुरक्षा मिळते.

अक्रोड हे हृदयासाठीही लाभदायक आहे. याच्या सेवनाने शरिरातील चरबी कमी होते, कोलेस्ट्रोल नियंत्रणात राहते. कारण ओमेगा-३ फँटि एसिड जे हार्टकरता उपयोगी आहे, ते विपुल आहे, अक्रोडात या कँसरविरोधि घटकाचे प्रमाण जास्त असते त्यामूळे दररोज अक्रोड खाल्ल्यामुळे ब्रेस्ट कँसर, प्रोस्टेट कँसर, व मलाशयाचा कँसर होण्याचा धोका कमी होतो,

अक्रोड खाण्यामुळे भूक कमी लागते, त्यामुळे वजन कमी करण्यासाठी उपयोग होतो, व याच कारणामूळे डायबेटिस२ आटोक्यात राहतो, अक्रोडामूळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. उच्च रक्तदाब आटोक्यात राहतो. अक्रोड हा दुर्बल, अशक्त व्यक्तिकरता खूपच लाभदायी आहे, सकाळी उठून २-३ अक्रोडाचे सेवन करावे, वरून एक कप दूध घ्यावे.

ज्या पुरूषांमध्ये शुक्रजंतू कमी असतात, ज्यामूळे ते प्रजोत्पादन करू शकत नाही, अशांनी नियमित अक्रोडाचे सेवन केल्यास फायदा होतो, अक्रोड हे वातघ्न असल्याने संधिवात, सायटिकि, सांधेदुखी, आमवात, या आजारावर चांगले परिणाम देते. ज्यांना गुडघे दुखीचा तीव्र स्वरूपात त्रास आहे त्यांनी सकाळी उठुन ३-४ अक्रोडाचे सेवन करावे.

अक्रोडाचे तेल नियमित सेवन केल्यास, आतड्यातील कृमी नाश पावतात व शौचावाटे बाहेर पडतात. अक्रोड हे सारक गुणधर्माचे असल्याने बद्धकोष्ठ, मलावरोध असणाऱ्यांनी अक्रोडाचे नियमित सेवन करावे, यात फायबर विपुल असल्याने वरिल त्रास होत नाही.

अक्रोड वनस्पतीची साल व पाने गंडमाळा, पुरळ, उपदंश, व त्वचारोग आदि रोगावर उपयोगी आहे.

अक्रोडाचि पाने कृमीनाशक आहे.

चेहऱ्यावरील काळे वांग, पिगमेटेशन, पुरळ असणाऱ्यांनी, अक्रोड बारिक वाटुन त्याचा लेप लावावा, चेहरा सुंदर होतो, अक्रोड बीज तेल हे साबण, व सौंदर्यवर्धक गोष्टित वापरतात, सहसा जेवणानंतर अक्रोड खावा, यामूळे जेवणाचे पचन चांगले होते. अकाली केस पांढरे होणे, केस गळणे या तक्रारिंवर, अक्रोड सिद्ध तेल वापरल्यास केस काळेभोर, व दाट होतात, .

तेव्हा अशा या भरपूर गुणांनी युक्त सुक्या मेवाला आपल्या दैनंदिन आहारात जरूर, सामील करावे.

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

**ज्योतिर्मय साहित्य**

मग भरताने दशरथाचे अन्त्य संस्कार केले.दान धर्म केला. त्यास अनावर शोक झाला. भगवत गितेत, शोक करू नकोस इथून कृष्ण अर्जुनास सांगून शेवटी पुन्हा शोक करू नकोस हेच पुन्हा सांगितले आहे .वसिष्ठाने त्यांचा शोक दूर केला.शत्रुघ्न हा घरी येताच क्रोध करू लागला हे सारे मंथरे मुळे घडले म्हणुन त्याने मंथरेस खूप मारले.मग भरताने त्यास अडविले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

लोक भरतास म्हणाले तू राजा हो. तो म्हणाला अयोध्येचा राजा हा रामच होईल.मी नाही. रामाला परत बोलावू म्हणून भेटायला जाण्याचे त्याने ठरविले

राम दोनदा एकच गोष्ट बोलत नव्हते कारण ते खरे बोलत होते. दुःखाचे दिवस संपल्या मुळे नगरात मंगल वाद्ये वाजू लागली, पण भारतास हे पटले नाही. राम इथे नसताना इथे मंगल वाद्ये कसे काय वाजू शकतात? म्हणून त्याने ती थांबविली. भरत तिनहीआई सोबत सर्वां सोबत रामास भेटण्यास तिकडे गेले. रामचंद्र प्रभू व भरत यांची भेट अलौकिक आहे. भरतास असे वाटले की लक्ष्मणा सारखे आपणही रामा सोबत राहू .त्याने वनात रामासोबत राहण्याची तयारीही केली.जटा बांधल्या, वल्कले गुहा राजा कडून घेऊन नेसली.व निघाला. लक्ष्मणास दुरून सैन्य येताना दिसले.त्याला वाटले भरत आपल्यावर युद्ध करण्या साठी आला आहे. रामाने त्यास अडविले. भारत आला त्याला हा त्रैलोक्याचा स्वामी इथे झोपडीत राहतो हे पिडादायक वाटले. तो गहिवरला व रामाच्या पायावर त्याने लोटांगण घातले. **(क्रमशः)**

## फुलमाला....





रातराणी...

सावळ्या रात्रीवर
चांदण्यांची फुंकर
दरवळ विहरला
धुंद गंधित दूरवर

शुभ्र मनमोहक ही
रातराणी फुलली
आनंदाचे गीतासह
मनी मृदू उमलली

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

## भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ - भाग तीन

बर्लिनमध्ये रवींद्रनाथांनी विद्यार्थ्यांना संबोधित करून त्यांच्याशी संवाद साधला. तेथून पुढे ते जिनिव्हाला गेले. तेथील वास्तव्यातच त्यांना सोविएट रशियात येण्याबद्दलचे निमंत्रण मिळाले. यापूर्वी त्यांचे रशियात जाणे झाले नव्हते. त्यामुळे रशियातील सामाजिक परिस्थिती, परंपरा इ. गोष्टी जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता होती. त्यांच्या या रशियाच्या भेटीत त्यांना तेथील ज्या ज्या गोष्टी चांगल्या आढळल्या, त्यांची त्यांनी मुक्तकंठाने स्तुती केली. नंतरच्या काळात भारत आणि रशिया या दोन देशांच्या दरम्यान संबंध दृढ होण्यास त्याची मोलाची मदत झाली. भारत रशिया दरम्यान मैत्रीचा पाया जणू त्यामुळे घातला गेला.

रशियात त्यावेळी कम्युनिझमची नुकतीच सुरुवात झाली होती. ही नवीन प्रणाली असल्याने तेथील सर्वसामान्य जनता त्याच्या विरोधात होती. या काळात रशियातील दोन वैशिष्ट्ये त्यांच्या नजरेत भरली. पहिली गोष्ट म्हणजे तेथील मोठ्या प्रमाणावर सामूहिक शिक्षण देण्याची व्यवस्था आणि दुसरी गोष्ट म्हणजे तेथील अशिक्षित, दरिद्री समाजाने मोठ्या कष्टाने स्वतः मधील आत्मविश्वास जागृत करून स्वतःची प्रगती साधण्यात मिळवलेले यश.

या दोन चांगल्या गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या तरी त्यातील उणीव सुद्धा त्यांच्या लक्षात आली. या सुधारणा एकांगी आहेत असे त्यांना वाटले कारण समाजात व्यक्ती आणि समष्टी असे दोन घटक असतात. या दोन्ही घटकांच्या परस्पर हिताचे समन्वयन घडवून आणणे महत्त्वाचे असते तरच व्यक्ती आणि समष्टी दोघांचेही कल्याण होऊ शकते असे त्यांचे मत होते. रशियातील आपल्या वास्तव्यामधील अनुभव त्यांनी रशियार चिठ्ठी या पुस्तकात लिहून ठेवले आहेत.

तेथील शिक्षणाबद्दल त्यांना असे वाटले की ही सामूहिक शिक्षण पद्धती सदोष आहे. त्यांनी शिक्षणाचा जणू एक साच्याच तयार केला आहे. परंतु साच्यातून स्वतंत्र व्यक्तिमत्व तयार होत नाही. जर शैक्षणिक तत्वे जिवंत मनाला सामावून घेणारी नसली तर त्यातून मने दुभंगली जातात, व्यक्तिमत्व विकास होत नाही.

रशियाने जी नवीन आर्थिक प्रणाली स्वीकारली होती त्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि हक्कांवरही गदा आली होती. या नवीन व्यवस्थेतील दोषही रवींद्रनाथांच्या लक्षात आले. त्याबद्दल आपले मत व्यक्त करताना ते म्हणतात, संपत्तीचे वैयक्तिक हक्क ज्याच्या त्याच्याकडेच राहू देऊन एका मर्यादेपर्यंत ते उपभोगण्याचा अधिकार देण्यात यावा. मर्यादांपलीकडचा अतिरिक्त भाग मात्र समाजाच्या वापरासाठी दिला गेला पाहिजे. त्यामुळे अती द्वेष, मत्सराच्या भावनेतून आलेल्या फसवेगिरी पासून या सांपत्तिक हक्काचा बचाव करता येईल. व्यक्तिशः लोकांच्या आवश्यक गरजा भागल्या पाहिजेत. परंतु त्याच वेळेला प्रत्येक बाब अशी मर्यादित हवी की ती समाजाच्या फायद्याची ठरावी. कोणताही उपाय हा नेहमी समाज आणि व्यक्ती या दोघांनाही मानवणारा असावा. रवींद्रनाथ आता सत्तरीचे झाले होते सततच्या प्रवासाने त्यांची शक्ती पण क्षीण झाली होती. पण तरी देखील परदेशातून आलेली आमंत्रणे ते नाकारत नव्हते कारण त्यानिमित्ताने बाहेरील जगाशी सांस्कृतिक नाते निर्माण करता आले तर ते त्यांना हवेच होते. ती त्यांची आवड होती. त्यानंतर पर्शिया आणि इराणच्या आमंत्रणावरून ते त्या देशांमध्ये गेले तेथे त्यांचे मोठ्या प्रेमाने आणि आपुलकीने स्वागत झाले. रवींद्रनाथ जागतिक कीर्तीचे महान कवी आणि साहित्यिक तर होतेच परंतु विशेष म्हणजे ते आशिया खंडातील असल्यामुळे या आशियाई देशांना रवींद्रनाथांचा विशेष अभिमान होता. ते त्यांच्याकडे इंडो आर्यन या नजरेने पाहत होते. आपला मूळ पुरुष एकच असून रवींद्रनाथांचा आणि आपला रक्ताचा संबंध आहे असे त्यामुळे ते मानत होते. त्यामुळे एक आशियाई व्यक्ती म्हणून रवींद्रनाथांचा प्रचंड अभिमान त्यांना होता. यानंतर इराकला भेट देऊन ते १९३२ मध्ये भारतात परतले. त्यानंतर त्यांनी एकदाच परदेश प्रवास केला. ते १९३४ मध्ये समुद्रमार्गे श्रीलंकेला गेले. तेथे त्यांनी व्याख्याने दिली आणि आपल्या चित्रांचे प्रदर्शनही भरवले. तेथील लोकांनी सुद्धा त्यांचे विशेष आदराने आणि आपुलकीने स्वागत केले. आता त्यांचे वय ७३ वर्षांचे झाले होते. परदेशात भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यात त्यांनी कोणतीही कसूर बाकी ठेवली नव्हती.

(क्रमशः)

## ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.


Dr Shaikh A H - 98606 99906

# सती प्रथेवर आधारलेला सत्यभामा प्रेक्षकांच्या भेटीसाठी

## ८ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

ज्योतिर्मय साहित्य

महिलाप्रधान चित्रपटांनी नेहमीच समाजाला आरसा दाखवत प्रेक्षकांच्या मनावर गारूड केलं आहे. आजवर अनेक महिलाप्रधान चित्रपटांनी केवळ समाजात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम केले नसून, काही आदर्शवत स्त्री व्यक्तिमत्त्वांच्या जीवनावर प्रकाशही टाकला आहे. अशाच प्रकारचे प्रेरणादायी कथानक असलेला सत्यभामा हा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज आहे. नुकतीच या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. सती जाण्याच्या अमानवी प्रथेवर आधारित असलेला सत्यभामा ८ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.





श्री साई श्रुष्टी फिल्म्स एलएलपी प्रस्तुत सत्यभामा - अ फरगॉटन सागा या चित्रपटाची निर्मिती मनीषा पेखळे, सारंग मनोज, अंकुर सचदेव आणि वीरल दवे यांनी केली आहे. सारंग मनोज आणि अभिजीत झाडगावकर यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. कथा, पटकथा आणि संवादलेखन मनीषा पेखळे यांनी केले आहे. एक लक्षवेधी मोशन पोस्टर प्रदर्शित करून सत्यभामा येणार असल्याचे निर्मात्यांनी घोषित केले आहे. मोशन पोस्टरवर आगीत होळपरणाऱ्या स्त्रीचा हात धरलेला पुरुषाचा हात पाहायला मिळतो. पुरूषाच्या हातात राखी दिसत आहे. मनाला चटका लावणारे हे पोस्टर सत्यभामाबाबत उत्सुकता वाढविण्याचे काम करणारे आहे. हा चित्रपट श्रीमती मनीषा पेखळे यांनी लिहिलेल्या सत्यभामा - एक विसरलेली गाथा या कादंबरीवर आधारलेला आहे. ही कथा सती प्रथेला बळी पडलेल्या सर्व निष्पाप स्त्रियांना समर्पित आहे. सतीचे दुःख जगासमोर आणण्याचा प्रयत्न या चित्रपटाद्वारे करण्यात आला आहे. १९व्या शतकातील ही




काल्पनिक कथा आहे. या चित्रपटाबाबत दिग्दर्शक द्वयी म्हणाले की, सत्यभामाची १९व्या शतकातील कथा आजही मनाला प्रचंड वेदना देणारी आहे. ही भाऊ बहिणीच्या प्रेमाची, त्यांच्या जीवनातील आनंदाच्या क्षणाची, त्यागाची व त्यांनी केलेल्या संघर्षाची गोष्ट आहे. डोळ्यांत अंजन घालणारी एक तेजस्वी आणि प्रेरणादायी कथा दर्जेदार निर्मितीमूल्यांच्या आधारे मनोरंजकरीत्या सत्यभामामध्ये सादर करण्यात आली आहे. त्यामुळे या चित्रपटाच्या रूपात प्रेक्षकांना मनोरंजनाचे एक परीपूर्ण पॅकेज पाहायला मिळेल असेही ते म्हणाले.

या चित्रपटात माधव अभ्यंकर, अभिजीत आमकर, भाविका निकम, सृष्टी मालवंडे, ज्योती पाटील, सारंग मनोज, ज्ञानेश्वर शिंदे आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. डिओपी जितेंद्र रामचंद्र आचरेकर यांनी सिनेमॅटोग्राफी केली असून, संकलन निलेश गावंड यांचे आहे. मनीषा पेखळे यांनी लिहिलेल्या गीतांना संगीतकार निखिल महामुनी यांनी संगीत दिले आहे. हनी सातमकर यांनी पार्श्वसंगीत दिले असून, सुमीत ओझा यांनी व्हीएफएक्स केले आहेत. कला दिग्दर्शन सचिन एच. पाटील यांचे, तर कोरिओग्राफी नरेंद्र पंडीत यांची आहे. शीतल लीना लहू पावसकर यांनी कॉस्च्युम डिझायनिंगसह स्टाईलचे काम पाहिले असून, नितीन सुचिता दांडेकर यांनी मेकअप केला आहे. मोहित सैनी या चित्रपटाचे फाईट मास्टर असून, अकबर शेख यांनी प्रोडक्शन कंट्रोलर म्हणून काम पाहिले आहे.



अरुण वि. देशपांडे-पुणे
9850177342

## आनंदाची लेणी

## आनंदी रहा....

ज्योतिर्मय साहित्य

मित्र हो नमस्कार

आपले जगणे सुसह्य करणे, सुखद करणे आपल्याच हातात आहे. आपण आनंदी तर जग आनंदी ‘‘ ही म्हण आपल्याला फक्त माहिती असून काही उपयोग नाही.

आहे त्यात आनंद मानणारा एखादा मित्र आपल्या सहवासात असला पाहिजे तरच आपला माईंड सेट

पॉझिटिव्ह होण्यास नक्कीच मदत होते.

खरे सांगायचे तर गोष्ट अशी आहे की, आपल्या गरजा जितक्या कमी, तितके जास्त समाधानी मन असू शकते. गरजा वाढवल्या जातात मग त्या पूर्ण करणे नाही जमले की मामला बिघडून जातो, ज्या गोष्टीत आनंद मिळत होता, त्या सोडून देत, न मिळणाऱ्या गोष्टींच्या दुःखात मन असलेल्या आनंदाला पारखा होऊन बसते.

याला इतर कुणी नाही तर तो स्वतःच जबाबदार असतो‘‘ हे मान्य करायला हवे.

मित्र हो, आपण आहोत तसे ठीक आहोत, व्यवस्थित चालू आहे ना सगळं !‘‘ हे समाधान मनाला आनंद देत असते.

पण दोघातले तो किंवा ती‘‘, कुणीतरी किंवा दोघेही

इतरांशी तुलना करण्याच्या मोहास बळी पडतात, इथूनच इतके दिवस रुळावरची गाडी घसरू लागते‘‘,पुढे सगळा गोंधळ उडून जातो.

ईर्ष्या, मत्सर, हेवा, यातून मन इतरांच्या सुखावर जळू लागते, त्यांचा द्वेष करू लागते‘‘, ही वृत्ती भयंकर आहे.

तुम्ही ज्याच्या बरोबर अशा भावनेने वागू लागता, त्याला याची खबरबात ही नसते, तो त्याच्या जगात मजेत असतो,

आनंदात असतो. पण तुमच्या मनात निर्माण झालेल्या

मत्सर, हेवा या भावना तुमच्या घरात नकारात्मक भावना निर्माण करून मन:स्वास्थच बिघडून टाकतात.

साधेपणातला निर्मळ आनंद कोसो दूर जातो, आणि नशिबाला दूषण देत बसून हाती दुःखच रहाते. स्वनिर्मित दुःख हे असते.

हव्यास आणि मोह या दोन गोष्टींनी मनाला घेरून टाकले की भली भली माणसे विचित्र वागू लागतात, ती स्वताला जणू दुःखाच्या खड्ड्यात ढकलून देतात.

निर्धार आणि निग्रह या स्वभाव-गुणांच्या मदतीने आपण मनातील निगेटिव्ह विचारांना दूर करू शकतो, दूर ठेवू शकतो‘‘ हे नक्की, पण, यासाठी असे दुर्गुण असलेल्या मित्रांना तुमच्या जवळ अजिबात फिरकू देऊ नका.

मग बघा तुम्ही निराश होणार नाही, दुःखी रहाणार नाही. आपले भले कशात आहे ? हे समजून वागणारा माणूस आनंदी रहातो, तुम्ही ही असे आनंदी रहा ! त्यासाठी शुभेच्छा




# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजमुद्रेतील शब्दांचा युनेस्कोमधील राजदूतांकडून सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेतील शब्दांचा गौरवपूर्ण उल्लेख हा तमाम शिवप्रेमी आणि महाराष्ट्रासाठी एक आनंददायी आणि अभिमानास्पद क्षण आहे. युनेस्कोमधील ग्रीसचे राजदूत जॉर्जिओस कौमुत्साकोस यांनी राजमुद्रेतील शब्दांचा ‘‘अतिशय विद्वत्तापूर्ण शब्द’’ असा उल्लेख केला आहे.

युनेस्कोमधील भारताचे राजदूत विशाल शर्मा यांनी ग्रीसचे राजदूत श्री. कौमुत्साकोस यांना शिवछत्रपतींच्या राजमुद्रेचे स्मृतीचिन्ह भेट दिले. त्यावेळी झालेल्या चर्चेत श्री. कौमुत्साकोस यांनी ही प्रतिक्रिया उत्स्फुर्तपणे व्यक्त केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजमुद्रेतील शब्दांची योजकता अत्यंत समर्पक असल्याचा उल्लेख त्यांनी केला. राजमुद्रेतील ‘‘शहाजींचे पुत्र शिवाजी (महाराज) यांच्या या मुद्रेचा महिमा चंद्राच्या कलांप्रमाणे वाढत राहील. जग त्याचा सन्मान करेल आणि ते केवळ लोकांच्या कल्याणासाठी चमकेल.’’ या ओळीतील प्रत्येक शब्दांचा अर्थही त्यांनी समजून घेतला आणि राजमुद्रेतील शब्द खरे ठरत आहेत, असेही नमूद केले.

# ‘‘रानभाज्यां’’ चा आस्वाद घ्या...

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

मार लागल्यास, ठेच लागल्यास दाह आणि सूज कमी करण्यासाठी ही वनस्पती वाटून त्यावर बांधतात. चिवळ ही वनस्पती मूळव्याधीवर गुणकारी आहे. चिवळची भाजी शीतल, आणि रक्तशुद्धी करणारी आहे. रक्तपित्तात ही भाजी प्रशस्त तर ज्वरात पथ्यकर आहे.

चिवळीची भाजी शरीरातील उष्णता कमी करणारी व लघवी साफ होण्यासाठी उपयुक्त आहे.

लघवीची, हातापायांची व डोळ्यांची होणारी जळजळ चिवळच्या भाजीने कमी होते.

चिवळी वनस्पतीमध्ये मज्जासंस्थेवर प्रभावी कार्य करणारे; तसेच कर्करोग प्रतिबंधक गुणधर्म असल्याचे अलीकडील संशोधनावरून सिद्ध झाले आहे.

कारल्याची भाजी... कारल्याचे फळ थंड व पौष्टिक असून ते खाल्ल्यावर पचनक्रिया सुधारते.

खोकला, पित्त, सांधेदुखी, त्वचारोग, कुष्ठरोग, बद्धकोष्ठता, मधुमेह इ. विकारांवर ते गुणकारी असते.

कारल्याचे किंवा कारल्याच्या रसाचे नियमित सेवन करणाऱ्याचे वजन कमी होते.

कारल्यात अ, ब आणि क ही जीवनसत्त्वे असतात.

काल्र्याने पचन क्रिया सुधारते. निरोगी राहण्यासाठी, हिरव्या भाज्या आणि फळे खाण्याची शिफारस करतात. फळे आणि भाज्या खाऊन निरोगी राहा.







फळे आणि भाज्यांमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात. आजी अनेकदा मुलांना कारले खाण्याचा सल्ला देतात.

कारले कडू असले तरी अनेक गुणांनी समृद्ध आहे. कारल्याचे सेवन करण्याचे अनेक फायदे आहेत. कारले खाल्ल्याने वजन कमी होते आणि कोलेस्ट्रॉलची पातळीही कमी होते. कारले हृदय गती निरोगी ठेवण्यासाठी देखील उपयुक्त आहे. पण जर तुम्हाला असे वाटत असेल की अधिक प्रमाणात कारले खाल्ल्याने तुमचे आरोग्य चांगले राहील, तर चुकीचे आहे.

तांदुळजाची भाजी... तांदूळजाही भारतात उगवणारी एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. याचा रानभाजी म्हणून समावेश होतो. ही भाजी मधुर रसाने समृद्ध आहे ताप गोर कांजणे, नेत्रविकार, पित्त विकार, मुळव्याध, यकृत विकारात ही उपयोगी आहे. त्वचेचे विकारात या भाजीचा उपयोग होतो. त्यामुळे दाह कमी होतो. म्हणून ही भाजी महत्त्वाची आहे. नाजूक प्रकृतीच्या व्यक्ती गरोदर स्त्रिया तसेच डोळ्याच्या विकारात पाणी येणे, ही भाजी उपयोगी आहे. वयस्कर माणसासाठी ही भाजी आरोग्यासाठी उपयोगी आहे.

लाल माठ भाजी.. लाल भाजी, श्रावणी माठ असेही म्हटले जाते. या भाजीची.. कोवळी पाने व कोवळे देठ खाण्यायोग्य असतात. जुलै-सप्टेंबर या कालावधीत जंगलात उपलब्ध असते. लोह, अ, ब, व क आदी कॅल्शिअम, मॅग्रेशिअम, फॉस्फरस, झिंक यात आहेत.

गुळवेल ची भाजी... गुळवेलाला वारुडवेल, अमृतवेल, अमृतवली गुडूची असेही म्हटले जाते. या भाजीची कोवळी पाने खाल्ली जातात. ही भाजी वर्षभर उपलब्ध असते. या भाजीमध्ये कॅल्शिअम, जीवनसत्त्व अ आणि क, प्रथिने, लोह, फॉस्फरस, तंतूमय पदार्थ व अँन्टिऑक्सिडेंट आहेत.

तरोट्याची भाजी... तरोटा या रानभाजीला टाकळा, तरवटा, चक्रमर्द आदी नावानेसुद्धा ओळखले जाते. या वनस्पतीचे शास्त्रीय नाव कॅशिया टोरा आहे. ही एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. हिच्या कोवळ्या पानांची भाजी करतात. ती पौष्टिक व वातनाशक आहे.

तसेच चिगोळ अंबाडी या बाजारी उपयुक्त आहे.

रान भाज्यांची ओळख व्हावी म्हणून अनेक ठिकाणी रानभाजी महोत्सव आयोजित केली जातात .आताही जळगाव, अकोला, लातूर,नांदेड, रत्नागिरी,राजापूर, वेंगुर्ला, कल्याण,पालघर,भंडारा,चंद्रपूर, नागपूर, अमरावती, बुलढाणा, वाशीम, सोलापूर, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, आदी सर्वच जिल्ह्यात कृषी विभागामार्फत अशा भाज्यांचे महोत्सव भरवले गेले आहेत. जेणेकरून सगळ्यांना या रान भाज्यांची ओळख होईल आणि त्या खाण्यास ते प्रवृत्त होतील. कारण अजून बऱ्याच भागामध्ये आणि बऱ्याच लोकांना या भाज्यांची ओळख नाही, ती व्हावी म्हणूनच असे प्रयत्न केले जातात. ह्या भाज्यांची ओळख व्हावी म्हणून या लेखाद्वारे माहिती संकलीत करून दिलेली आहे. रोगप्रतिकार शक्ती वाढण्यासाठी फायबर तसेच सर्व प्रकारची सूक्ष्म अन्नद्रव्ये मिळण्या करिता रानभाज्या खाव्यात. कोवळ्या अवस्थेतील रानभाज्या आरोग्याच्या दृष्टीने अधिक फायदेशीर असतात.याव्यतिरिक्त अजूनही नंदुरबार, शहादा, गडचिरोली, कोकणात, बऱ्याच रानभाज्या आहेत.

# गुरुपौर्णिमा... गुरु-शिष्याचा मंगल दिन:

ज्योतिर्मय साहित्य

भारतीय संस्कृती ही अनेक सुंदर रीती,परंपरा, त्यांना अनुसरून खास उत्सव,सणवार, खाद्यसंस्कृती,वैविध्यपूर्ण यांनी अत्यंत समृद्ध अशी असल्यामुळे केवळ भारतीयच नाहीत तर परदेशातसुद्धा आत्मसात करून साजरी केली जाते. त्यातीलच एक गौरवास्पद परंपरा म्हणजे ही गुरुपौर्णिमा!

आषाढ शुद्ध पौर्णिमेला म्हणजे या तिथीला आपण गुरुपौर्णिमा,व्यास पौर्णिमा म्हणून गौरवितो.महर्षी व्यास मुनींना आद्यगुरू मानून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे पूजन केले जाते. कारण महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे, असे रामायण, महाभारत यां सारखे अनेक सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिले. आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली ती जतन करून पुढे नेणे हे आपले कर्तव्य आहे. कारण गुरु शिवाय विद्या मिळत नाही. विद्येविना धन,सुख,मोक्ष प्राप्ती कशी मिळेल?

आपण कोणाचे तरी शिष्य आहोत, या भावनेत एक कृतज्ञता वाटते. भारतीय गुरुपरंपरेत गुरु-शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. जनक-याज्ञवल्क्य, शुक्राचार्य-जनक, कृष्ण, सुदामा-सांदिपनी, विश्वामित्र-राम, लक्ष्मण, परशुराम-कर्ण, द्रोणाचार्य-अर्जुन अशी गुरु-शिष्य परंपरा आहे. मात्र एकलव्याची गुरुनिष्ठा पाहिली की, सर्वांचेच मस्तक नम्र झाल्याशिवाय राहत नाही. गुरु या शब्दाचा खरा अर्थ ठाऊक नसेल, तर जप, तप, व्रत, तीर्थाटन, योग आणि त्याग हे सर्व व्यर्थ आहे.


गुरूजवळ शिष्याने नम्र झाल्याविना त्याला ज्ञान प्राप्त होत नसते. -अज्ञानाचा अंधकार नाहीसा करून ज्ञानाच्या, प्रकाशाच्या वाटेकडे घेऊन जातात ते!सदगुरु नावाड्याचे काम करतात. आपली जीवनरूपी नौका योग्य दिशेला घेऊन जातात. कुबेराचा अक्षय्य खजिनाच आहे आणि त्या खजिन्याचे मोल होऊच शकत नाही.

गुरू म्हणजे एक प्रसाद आहे. ज्याच्या भाग्यात असेल त्याला कांहीच मागण्याची इच्छा उरत नाही.गुरु म्हणजे सूर्यापेक्षाही तेजस्वी तेज आणि चंद्रापेक्षाही शीतल छाया देणारा आधार.तो एक चिंतामणी, परिस,अमृत यांच्यापेक्षाही श्रेष्ठ असतो. म्हणूनच मनुष्य जन्मात प्रत्येकाने गुरु करावाच. अगदी भगवंतांनी सुद्धा मनुष्यरूपात असताना गुरु केलेच होते. ज्ञानेश्वर माऊलींनी सुद्धा निवृत्ती नाथाना, श्रीकृष्णांनी सांदीपनी ऋषींना गुरू मानले होते. संत नामदेवांनी विसोबा खेचरांना गुरु मानले होते.


आपल्या जीवनात गुरुंना जेवढे महत्त्व आहे तेवढेच किंबहुना त्यापेक्षा जास्त महत्त्व सदगुरुंना आहे. सर्व मानवजातीला पारमार्थिक, आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणारे, भक्ताला, साधकाला मोक्षाप्रत नेणारे सदगुरु!दत्तगुरू हे या परमार्थातील एक सर्वश्रेष्ठ सद्गुरू मानले जातात.

गुरुबिन कौन बतायें 'बाँट ।' हा मायारूपी भवसागर तरून जायचे असेल तर सदगुरुंची आवश्यकता आहे. सदगुरुच आपल्याला मोक्षाप्रत नेतात. तसेच त्यांची त्यात सत्ता पण असते. सदगुरुच सर्व काही करवून घेत असल्यामुळे नामधारकाच्या 'मी' ला कुठेही वाव नसतो. सदगुरुंकडून अनुग्रह घेतला की दुसऱ्या कोणत्याही संतांकडून अनुग्रह घेऊ नये अशी संकल्पना आहे. त्यांच्याशी एकनिष्ठेने राहावे. आज्ञा पालन करावे. एक गुरु, एक नाम असावे.मनात कोणताही किंतू न ठेवता,विकल्प येऊ न देता त्यांनी सांगितलेली साधनाअगदी मनोभावे नित्यनियमाने करावी. सदगुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द चालवणे म्हणजे खरे गुरुपूजन !दिवशी शिष्य भक्तीभावाने गुरुंचे पूजन करतात व गुरुदक्षिणा देऊन कृतज्ञता व्यक्त करतात.

माझ्या मते सदृश्य आणि अदृश्य, मूर्त..अमूर्त, अशा स्वरूपात प्रत्येकाला गुरु भेटत असतात.दृश्य किंवा मूर्त गुरूंना आपण



डोळ्यांनी पाहू शकतो,पायांना स्पर्श करून आशीर्वाद घेऊ शकतो.पण काही गुरु हे अदृश्य स्वरूपात सुद्धा आपल्याला पदोपदी भेटत असतात. त्यातला मोठा आणि मुख्य गुरु म्हणजे अनुभव! गुरु आपल्याला शिकवतो, ज्ञान देतो तसे हा अनुभवरुपी अदृश्य गुरुसुद्धा आपल्याला चांगले ,वाईट प्रसंगातून कायम धडे देऊन तावून सुलाखून प्रसंगी छोट्या चाचण्या,मोठ्या परीक्षा घेऊन शहाणे आणि खंबीर बनवतो. कोणत्याही संकटाला नं घाबरता त्याच्याशी दोन हात करून धैर्याने पुढचा मार्ग दाखवणाऱ्या वाटाड्याचेही काम करत असतो. जबाबदारी ओळखून चांगले, वाईट यांची ओळख करून देतो.



सौ.स्नेहा मुसरीफ, पुणे

त्यापेक्शाही मोठा दुसरा गुरु म्हणजे आपले स्वतःचे मन! हेच नं भरकटू देता ,वाईट विचार बाहेर काढून ते शांत करण्याचे सामर्थ्य अनुभव याच गुरुत आहे. फक्त ते आपल्याला ओळखू यायला पाहिजे आणि जे धडे मिळाले त्यांचा अभ्यास..विचार करून मन ताब्यात ठेवता आले पाहिजे.

अनुभव रुपी गुरुंकडून जे चांगले विचार मिळतात ते आचरणात आणून वागणारे शिष्य हेच आदर्श शिष्य असतात. सुख, दुःख हे सुद्धा आपले गुरूच असतात. दोघेही आपली परीक्षाच घेत असतात. अती सुखात सुद्धा आपण हुरळून जाता कामा नये आणि संकटात सुद्धा डगमगू नये .हे ज्याला समजले,उमजले आणि आचरणात आणणे जमले तो उत्तम शिष्य! जे आपल्याजवळ नाही त्याची खंत नं करता आपल्याकडे काय आणि किती चांगले आहे हे ज्याला दिसते,जाणवते तो डोळस श्रेष्ठ शिष्य!सतत कार्यरत राहून दुसऱ्यांच्या कामी येणे, स्वार्थ आणि मोह टाळण्याचा पराकाष्ठेने प्रयत्न करून त्यात यश मिळवतो तो खरा आदर्श शिष्य असतो.

गुरूंकडून प्राप्त झालेल्या विद्येचा उत्तम अभ्यास करून तो व्यवस्थित सदुपयोग करतो,स्वतः बरोबरच समाजासाठी लोकांच्या हीतासाठी वापर करतो तोच आदर्श शिष्य असतो.द्रोणाचार्य हे अर्जुनाचेही गुरु होते आणि दुर्योधनाचे सुद्धा! दोघांनाही त्यांनी सारखेच शिक्षण दिले होते, पण अर्जुनाने त्या विद्येचा योग्य पद्धतीने आणि धर्माच्या ,सत्याच्या बाजूने वापर केला त्यामुळे तो सर्वश्रेष्ठ धनुर्धर म्हणून

कीर्तिवंत झाला. तिच गोष्ट कर्णाच्या बाबतीत

पण घडली. तो सुद्धा खरेतर विद्या,शक्ती,बुद्धी सर्व बाबतीत अर्जुनापेक्षा सरस होता. त्याला हरवणे अर्जुनालाच काय, कोणालाही शक्यच नव्हते.पण केवळ त्याने मैत्रीसाठी म्हणून दुर्योधनाची म्हणजेच अधर्माची साथ दिली, ही त्याची एक चूक त्याला रसातळाला घेऊन गेली.

अजून एक महत्वाची कसोटी शिष्यासाठी असते ती म्हणजे एकाग्रता, मन स्थिर करून, योग्य मार्गाने आपले लक्ष्य ,ध्येय साध्य करणे. त्यासाठी खूप परिश्रम, ध्यास असावा लागतो.याही बाबतीत एकलव्याचेच उदाहरण घेऊया. त्याने मूर्त रुपातील गुरु कडुन विद्या न घेता अमूर्त अशा गुरु कडुन प्राप्त केली होती. द्रोणाचाऱ्यांनी त्याला शिकववण्यास नकार दिला पण त्याने मनाने आधीच त्यांना गुरुचे स्थान दिले होते. त्यामुळे त्याने गुरु द्रोणाचाऱ्यांचा मातीचा पुतळा बनवला आणि त्यांच्यासमोर अतिशय परिश्रम करून धनुर्विद्येत स्वतःला इतके पारंगत केले की खुद्द द्रोणाचार्य सुद्धा आवाक झाले. अर्जुन त्यांचा सर्वांत लाडका विद्यार्थी होता त्यामुळे त्याच्यापेक्षा एकलव्य सरस ठरेल की काय असे त्यांना वाटले तेंव्हा त्यांनी ज्या हाताच्या अंगठ्यावरच धनुर्विद्या वापरली जाते तो अंगठाच गुरुदक्षिणा म्हणून त्याला मागितला आणि एक क्षणभर सुद्धा विचार नं करता त्याने तो गुरुचरणी कापून अर्पण पण केला. ही खरी थोर त्यागाची गुरुदक्षिणा!गुरूंची आज्ञा प्रमाण मानून त्याचे मनात कोणताही किंतु,परंतु नं आणता पालन करणे हा खरा शिष्यधर्म होय हेच एकलव्याने सुद्धा जाणले होते. आपल्यासारख्या सामान्य लोकांना गुरूंचे हे अशी गुरुदक्षिणा मागणे चुकीचे वाटू शकते कारण एक म्हणजे त्यांनी प्रत्यक्ष शिक्षण दिले नव्हते. एकलव्याने स्वतः मनाने परिश्रमाने ही विद्या प्राप्त केली होती तरीही त्याच्याकडून अंगठा मागणे म्हणजे त्याने कमावलेली सारी विद्याच काढून घेतली होती. हे खूप चुकीचे वाटते. पण तरीही त्याने का दिला असावा अंगठा?

विचार केल्यावर दुसरी बाजूही लक्षात येते ती म्हणजे हे महायुद्ध घडणार याची गुरूंना नक्कीच कल्पना असणार. मग अशावेळी त्यात अर्जुन म्हणजे धर्म,सत्य,न्याय यांच्या विचार करून योग्य मार्गाने चालणारा असल्यामुळे आणि महायुद्धात त्याने जिंकून राज्य योग्य हातात जाणे सामाजिक दृष्टीने जास्त महत्वाचे होते. असा दूरदर्शीपणा गुरुठायी असायला पाहीजे. तोच आदर्श गुरु असतो. आणि गुरु जे करतात ते योग्यच अशी खात्री एकलव्याला सुद्धा होती म्हणूनच त्याने ती आज्ञा मानली. यात गुरु आणि शिष्य दोघेही तोडीसतोड होते. म्हणूनच या गुरुशिष्याची आदर्श जोडी युगानुयुगे पुजली जाते. गुरु सुद्धा हुशार,चाणाक्ष, दूरदर्शी तर असलाच पाहीजे पण त्यांचा सर्वांत महत्वाचा कस म्हणजे जे जे त्यांच्याठायी ज्ञान आहे ते संपूर्ण शिष्याला देणे ,घडवणे. एखादा स्वतः खूप डिग्री, मेडल्स घेतलेला, अनेक विद्या आत्मसात असलेला असेल पण त्याने ते फक्त स्वतः साठीच वापरले, ते कोणालाही दिले नाही तर त्याचा काय उपयोग? असलेल्या विद्येचा, ज्ञानाचा योग्य वापर करणेसुद्धा तितकेच महत्वाचे असते. सर्व ज्ञान योग्य पद्धतीने देऊन समर्थ ,आदर्श शिष्य जो घडवतो तोच खरा महान गुरु असतो. म्हणजेच गुरूने आपल्याठायी असलेली सर्व विद्या शिष्याला देणे आणि शिष्यानेही ती सर्व प्रयत्नपूर्वक आत्मसात करून घेण्याची आणि त्याचा सदुपयोग करणे ही दोघांचीही जबाबदारी असते. हे जाणून जे कर्म ,वर्तन करतात तेच आदर्श गुरु आणि शिष्य बनतात.

''जो जो जयाचा घेतला गुण। तो म्यां गुरु केला जाण। गुरुसी पडले अपारपणजगसंपूर्ण गुरु दिसे।।''असे सांगून अवधूतांनी २४ गुरु केले.

साक्षात दत्तगुरूंनी सुद्धा चोवीस गुरूंना आदर्श मानून त्यांच्याकडून अनुभवरूपी ज्ञान प्राप्त करून घेतले होते. मग आपल्यासारख्या सामान्य मनुष्यांना तरी गुरुची आवश्यकता असणारच!चला मग आपणही या मंगलमय गुरुपौर्णिमा दिनी गुरूंचे पूजन करून आशीर्वाद घेऊन पावन होऊ. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा, गुरुर्साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः।

***

# हितगुज !


ज्योतिर्मय साहित्य

''गुरू ब्रह्मा, गुरुर विष्णु, गुरु देवो महेश्वरा,
गुरु साक्षात् परम ब्रह्म, तस्मै श्री गुरुवे नमः''

हा श्लोक म्हणत आम्ही शिक्षकांना गुरु मानत शाळेत गेलो. गुरु म्हणजे देवस्थानी आहे. ते रागवले , चिडले किंवा एखादा धपाटा घातला तरी त्यात काही गैर नाही. कुंभार मडके जसे घडवतो तसे शिक्षक तुमच्या आयुष्याला आकार देतात! हे आमचे शिक्षकांविषयी विचार होते, आहे आणि राहतील. पण अलीकडे वरचे वर ऐकू येत असतं, शाळेत शिक्षिकेने रागवल्याने पालकांनी तिचा समाचार घेतला. शाळेत तक्रार केली. आता ती मॅडम माझ्या मुलीला,मुलाला एक शब्द ही बोलणार नाही! असं अगदी ताठ मानेने सांगतात पालक? अरें काय म्हणावे तुम्हाला, तुमच्या ह्या वागण्याचा परिणाम तुमच्या मुलांच्या मनावर जास्त होणार आहे. मी काही केलं तरी आई-वडील आहेत, शिक्षकांवर चिडतील. शिवाय शिक्षकांविषयी चा आदरभाव तर नाहीच! शिक्षक हा वाट दाखवतो, चांगले वाईट ह्यात फरक कसा ओळखावा हे शिकवतो. अहो जरा विचार करा, २.५ वर्षाचे मुल आपण शाळेत टाकतो प्ले गृप मध्ये, तेव्हा शिक्षीका त्याची आई सारखी काळजी घेते. मग त्याच हक्काने जरा ओरडली तर काय हरकत आहे.

पालकांनो मुलांना चांगले संस्कार आणि सवयी जितके, आपण लावतो तितकेच शिक्षक ही लावतात. त्यांच्यावर विश्वास ठेवा! प्रत्येक वेळी माझ्या पाल्याला असं का बोललात, हात कसा लावलात म्हणत त्यांना जाब विचारण्यापेक्षा गोष्टींचे गांभीर्य लक्षात घ्या. अगदी तसेच गैर वर्तन घडल्यास तूम्ही मुलांची ढाल बनून असणारच. पण शुल्लक गोष्टींवरून शिक्षकांना वेठीस धरून तुम्ही तुमच्या मुलांना वळण लावण्यात असमर्थ ठराल. आपल्या लहानपणीचं गाणं विसरलात का?

''छडी लागे छम छम, विद्या येई घम घम''



आपल्या लेकरांना आता ह्या छडीचा अनुभव कदाचितच मिळेल, कारण कायदे अनेक लागु झालेत. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांचं नातं ही बदलत जातांना दिसतं. फक्त एकच करा, शिक्षकांवर विश्वास ठेवा आणि आपलं मुल त्यांच्या सुपूर्त करा. कृपया काळजी घ्या की शिक्षकांचा अनादर होणार नाही. खूप लहान वयात मुलं शाळेत जातात. शिक्षक त्यांच्या मानसिकतेचा अभ्यास करून त्यांना घडवतात. खरंच विचार करा आपल्या सारखे पालक तरी आजकालच्या या फास्ट पिढी कडून इतक्या शांततेत नवनवीन ॲक्टिव्हिटी करून घेऊ शकतो का..... आपल्याला शिकवणारे आपले शिक्षक आठवा,

सौ.प्रियंका गौरव जावळे

दिवसभर वर्गा बाहेर उभं केलं तरी आई-वडील कधी का? म्हणून शाळेत आले नाही. आपले शिक्षक तर ग्रेटच आहेत पण आपल्या मुलांचे शिक्षक ही आदरणीय आहेत. कारण आजच्या बदलत्या काळानुसार आलेल्या अनेक समस्यांना तोंड देत ते आपल्या मुलांना घडवत आहेत. त्यांना योग्य आदर आणि सहकार्य मिळावे इतकेच वाटते.

गुरू हाच परीस आहे, ज्याचा स्पर्श होताच आपल्या आयुष्याचं सोनं होतं ! गुरू पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा !

# पंपकीन फेस्टीव्हल (लाल भोपळा महोत्सव)

ज्योतिर्मय साहित्य



इकडे नवरात्र संपल्यावर जिकडे जाईल तिकडे लाल मोठे मोठे भोपळे आणि त्यांची सुंदर सजावट दिसू लागली.अगदी शेताच्या कडेला ,रस्त्यावर,वाटेत जिथे बघेल छान वेगवेगळ्या पद्धतीने मांडलेले भोपळे दिसू लागले.वॉलमार्ट, मॉल मध्ये खास फॉल, पंपकिन फेस्टीव्हल साठी आणि हॅलोविन साठी केशरी रंगाचे आणि काळ्या रंगाचे भरपूर कपडे दिसू लागले.. त्या सणांसाठी लागणारे खाणे,चॉकलेट चे प्रकार,नटण्याच्या वस्तू दिसू लागल्या सगळीकडे उत्साही वातावरण निर्माण झाले.

मूळ अमेरिकेत साधारण या ऋतूत लाल भोपळा आणि स्वीट कॉर्न मोठ्या प्रमाणात पिकतो,त्यातही भोपळा खुप टिकतो त्यामुळे ही प्रथा सुरू झाली असावी त्यात आणि खूप लोककथेंचा समावेश झाला आणि हळूहळू अमेरिका आणि कॅनडा इथे हा उत्सव मोठ्या प्रमाणात सुरू झाला.अशाच एका महोत्सवात सामील झालो.सगळीकडे भरपूर प्रमाणात लाल मोठे भोपळे पसरून ठेवले होते.इथले लोक त्यांच्या बरोबर आपल्या कुटुंबीयांसमवेत वेगवेगळे फोटो काढून घेत होते.भाषा माहीत नसलेली आणि न कळणारी गाणी लावली होती पण त्यांचा ताल आणि ठेका मनाची प्रसन्नता वाढवत होता.आम्हीं ही सहभागी होऊन सगळ्यांबरोबर त्याचा भरपूर आनंद घेतला.




दुसरा मोठा येथील लोकांचा सण म्हणजे हॅलोवीन. हा ३१ ऑक्टोंबर या दिवशी असतो. इसवी सन पूर्व काळात ब्रिटिश लोक आणि आयरिश लोकांचा असा विश्वास होता की या दिवशी त्यांच्या पूर्वजांचे आत्मे जमिनीवर उतरतात. त्यांची भीती वाटू नये म्हणून त्यांनी शेकोटी पेटवायला सुरुवात केली. हळूहळू हे स्कॉटिश आणि आयरिश लोक अमेरिकेत स्थलांतरित झाले. तिथे त्याचे उत्सवात रूपांतर झाले. अमेरिकेतील लोकांनी या भीतीला मजे मध्ये रूपांतरित केले. त्यासाठी त्यांची वेशभूषा घ्यायला लागले. त्याचबरोबर बरोबर येथील प्रसिद्ध मूवी कॅरेक्टर आणि कार्टून कॅरेक्टरची पण वेशभूषा घेऊ लागले. ती वेश भूषा घेऊन उत्तम सादरीकरण करणे आणि भेट म्हणून चॉकलेट देणे ही प्रथा सुरू झाली. एकूणच भीतीदायक सर्व प्राणी, चेहरे यांच्या वेशभूषेमुळे जीवनातील भीती जाऊन त्या जागी आनंद निर्माण करावा हा हेतू असावा.लहान मुलांचा हा पर्वणीचा सण असतो.सगळी छोटी छोटी मुले वेगवेगळ्या रूपात येतात आणि त्यांना मोठी माणसे त्यांना चॉकलेट्स देतात.त्यांच्या हातातली बॅग वेगवेगळ्या चॉकलेट ने भरून जाते. आणि त्यांचा चेहरा आनंदाने फुलतो.

काही स्कॉटिश आणि आयरिश लोकांच्या बंगल्याच्या दारात असे वेगवेगळे पुतळे करून लावले होते.ठिकठिकाणी हॅलोविन चा उत्सव चालला होता. तिथेही वेगळे कॅरेक्टर प्राणी यांची सजावट केली होती.साधारण आपल्याकडे कसे संक्रांतीला तीळगुळ देतात त्या प्रमाणे इथे वेगवेगळी चॉकलेट्स लहान मुलांना वाटली जात होती.

भारतात खूप संस्कृती आणि अनेक वेगळे सण आणि प्रथा मी पहिल्या होत्या.. पण कॅनडात मला पूर्ण अनभिज्ञ असलेली संस्कृती आणि प्रथा पाहायला आणि अनुभवायला मिळाली.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559